
एलिजाबेथ ब्लॅकवेल

पहिली महिला डॉक्टर

कैरल ग्रीन

मराठी :
अश्विनी बर्वे





एलिजाबेथ ब्लॅकवेल (१८२१-१९१०)


एलिजाबेथ ब्लॅकवेल एक वेगळी व्यक्ती होती.

जिचा जन्म १८२१ मध्ये झाला होता.

१९१० मध्ये मृत्यू झाला.

कठीण संघर्षा नंतर, एलिजाबेथ ब्लॅकवेल पहिली महिला डॉक्टर झाली. जो त्यांची कहाणी आहे.

विषयसूची



एलिझाबेथ ब्लॅकवेलचा जन्म इंग्लंडमधील ब्रिस्टल येथे झाला होता.

अध्याय १

छोटी लाजाळू

एलिजाबेथ कधी जास्त बोलली नाही. ती एवढी शांत होती की, वडील तिला "लाजाळूचे झाड" म्हणत असत. पण एलिज़ाबेथ खूप विचार करे आणि खूप चिंता करे.

तिला एक चांगली मुलगी व्हायचे होते आणि म्हणून ती चिंतेत होती,फरशी वर झोपण्याने ती खरंच चांगली होईल का? एलिजाबेथने प्रयत्न करून पाहिला. पण त्याने काम झाले नाही.

एलिजाबेथला लग्नाचीपण काळजी वाटे. जर तिचे लग्न झाले नाही तर? तो काळ अविवाहित महिलासाठी एक भयानक काळ होता.

अविवाहित महिला शिकवू शकत होत्या, शिवणकाम करू शकत होत्या, किंवा मोलकरीण होवू शकत होत्या. महिलाना बऱ्याचवेळा दुसऱ्या लोकांच्या घरी राहावे लागत असे.






नोकर श्रीमंतांच्या घरात काम करायचे. नोकरांनी घरातील सर्व कामे केली, त्यात केस (डावे) बनविणे आणि अन्न (टॉप) सर्व्ह करणे यासह काम केले.

पण कधी-कधी एलिजाबेथ खूप व्यग्र असे आणि चिंता करत नसे, तिला शिकायला आवडत असे. तिला प्रवास करणे आणि आपल्या आठ बहिणी आणि भावांसोबत खेळायला आवडत असे.

सगळ्यात जास्त, एलिजाबेथला शिकायला आवडत असे. वडिलांनी आपल्या सर्व मुलांसाठी चांगले शिक्षक नियुक्त केले होते.



ब्लॅकवेल परिवार अशा पद्धतीने जहाजातून अमेरिकेत आलं होतं.


जेव्हा एलिजाबेथ ११ वर्षाची होती,तेव्हा तिचा परिवार इंग्लडहून अमेरिकेत गेलं. जहाजाच्या प्रवासात साडेसात आठवडे लागले. एलिजाबेथ समुद्रात आजारी पडली.





जेव्हा ब्लॅकवेल तिथं पोहचले तेव्हा न्यूयॉर्क शहरात खूप गर्दी आणि घाण होती. खूप लोक अस्वच्छ वस्तीत राहत असत. तुम्ही वरच्या गल्लीत डुक्कर बघू शकता का?.

सुरुवातीला एलिजाबेथला अमेरिका खूप आवडली नव्हती. ब्लॅकवेल परिवार न्यूयॉर्क शहरात एका विचित्र घरात राहत होते. जिथं डुक्करं रस्त्यावर फिरत असत.



गुलामांना कोणत्याही इतर संपत्ती सारखं खरेदी आणि विकलं जाई.


सगळ्यात वाईट गोष्ट ही होती की अमेरिकतील काही भागामध्ये गोऱ्या लोकांकडे काळे नोकर होते. त्यांना गुलाम म्हटले जाई. वडील आणि एलिजाबेथला गुलामीचा तिरस्कार होता.

नंतर, ब्लॅकवेल परिवार न्यू जर्सीला गेला. पण एलिजाबेथ, न्यूयॉर्कच्या शाळेत गेली.

तिला अजूनही शिकायला आवडत होते-एक विषय सोडून. तो विषय होता शरीर-विज्ञान . शरीर आणि आजार याबद्दल वाचायला एलिजाबेथला आवडत नसे.

एलिजाबेथ एक मजबूत, स्मार्ट मुलगी झाली होती. पण अजूनही ती छोटी आणि लाजाळू होती आणि अजूनही खूप काळजी करत असे.

आता एलिजाबेथला या गोष्टीची चिंता वाटे की ती आपल्या आयुष्यात काय करेल? ती काहीतरी महत्वपूर्ण करू इच्छित होती. पण एक मुलगी होती. ती काय करू शकत होती?



१८५०च्या दशकात सिनसिनाटी. शहरात ओहायो नदीवर वाफेवर चालणारी बोटी थांबत असत.



अध्याय दोन

एक अजब विचार

तिचा परिवार ओहियोच्या सिनसिनाटी शहरात राहायला गेले. एलिजाबेथला सिनसिनाटी शहर खूप सुंदर वाटले. असं होऊ शकतं की ती तिथं काही महत्वपूर्ण करू शकेल.

पण तीन महिन्यानंतर तिच्या वडिलांचा मृत्यू झाला. मग ब्लॅकवेल परिवार खूप गरीब झाला.

अमेरिकेत सुद्धा महिला शिकवणे, शिवण करणे, मोलकरीण होणे किंवा एखाद्या कारखान्यात काम करण्याशिवाय काही करू शकत नव्हत्या.







एकोणिसाव्या शतकात महिला कपडे तयार करणे आणि शिवण्याचे काम करत असत.त्या गर्दी असणाऱ्या कारखान्यात कमी मजुरीवर अनेक तास काम करत असत.



सगळ्यात आधी, एलिजाबेथच्या मनात डॉक्टर होण्याचा एक अजब विचार आला.

ब्लॅकवेलने आपल्या घरातच एक शाळा सुरु केली. एलिजाबेथला शिकवायला आवडत नसे, पण तरीही तिने शिकवले.

मग एक दिवस ती आपली आजारी मैत्रीण मेरीला भेटायला गेली. मेरी म्हणाली जर तिच्याजवळ कोणी महिला डॉक्टर असती तर तिला खूप वाटलं असतं.

“तू डॉक्टर का नाही होत?” तिने एलिजाबेथला विचारलं. “तू एक चांगली डॉक्टर होशील. यावर तू विचार करशील असं वचन मला दे.”

एलिजाबेथने वचन दिलं. पण तो एक अजब विचार होता. महिला डॉक्टर होवू शकत नव्हत्या. याशिवाय शरीर आणि आजारांचा तिला तिटकारा होता.

पण मेरीचा अजब विचार तिच्या डोक्यातून गेला नाही.कोणाला तरी पहिली डॉक्टर व्हावंच लागेल. मग एलिजाबेथ का नाही?

शेवटी तिने निर्णय घेतला.ती जरूर प्रयत्न करेल.ती शिकवेल आणि पैसे वाचवेल आणि दुसऱ्या डॉक्टरां बरोबर शिकेल, पैसे मग ती मेडिकल कॉलेज मध्ये जाईल.




एकोणतीस मेडिकल कॉलेजांनी एलिजाबेथचा अर्ज रद्द केला.पण तरीही ती प्रयत्न करत राहिली.

एलिजाबेथने दोन वर्षे काम केलं. तिला घर सोडावं लागलं. ते कठीण होतं. एकवेळ तिला वाटलं की ती तुटून जाईल. “मला मदत कर.” तिने प्रार्थना केली.


तेव्हा तिला देव आपल्या बरोबर आहे असं जाणवलं. तिला माहित होतं की ती योग्य काम करत आहे. शरीर आणि आजारांचा आता तिला तिटकारा वाटत नव्हता.शरीर सुंदर होते.

अधिकांश मेडिकल कॉलेजांना कोणी महिला विद्यार्थी नको होती. एकोणतीस कॉलेजांनी तिला ‘नाही’ सांगितलं. पण एलिजाबेथ प्रयत्न करत राहिली. शेवटी न्यूयॉर्कच्या जिनिव्हा कॉलेजने तिला “हो”म्हटलं.



न्यूयॉर्कमध्ये जिनेव्हा मेडिकल कॉलेजमध्ये, एलिजाबेथ ब्लॅकवेलला मेडिकलचीपहिली महिला विद्यार्थिनी म्हणून स्वीकार केलं..

४ नोव्हेंबर १८४७ला एलिजाबेथ जिनिव्हासाठी रवाना झाली. शेवटी तिने एक महत्वपूर्ण काम सुरु केलं.



अध्याय 3

डॉक्टर ब्लॅकवेल

खूप लोकांनी असा विचार केला होता की एलिजाबेथला मेडिकल कॉलेजमध्ये कधीच प्रवेश मिळणार नाही. काहींनी तर तिला वेडं केलं. काहीं तिला वाईटसाईट बोलले.

पण एलिजाबेथने खूप कष्ट घेतले, पुरुष विद्यार्थीनी तिला स्वीकारलं. ते नेहमी तिच्याशी विनम्रतेने वागायचे.

डॉक्टर ब्लॅकवेलने मेडिकल कॉलेजमध्ये जितकी शिकू शकत होती तितकं शिक्षण घेतलं..



एलिजाबेथने १८४९मध्ये मेडिकल कॉलेजची डिग्री घेतली.

२३ जानेवारी १८४९ला एलिजाबेथने आपल्या वर्गात प्रथम नंबर मिळवला. ती आता डॉ. ब्लॅकवेल होती. ती आता अमेरिकेची पहिली महिला डॉक्टर होती.





ब्लॅकवेलने जिनेवा मेडिकल कॉलेजचा डिप्लमा लॅटिन मध्ये लिहला होता. कॉलेजचे अध्यक्ष (डावीकडे) डॉ. बेंजामिन हेल यांनी त्यांना डिप्लमा प्रदान केला.



पॅरिस, फ्रान्स मधला एक रस्ता.

एलिजाबेथला अजून शिकावं वाटत होतं, म्हणून ती एक दवाखान्यात काम करायला पॅरिस, फ्रान्सला गेली. पण तिथल्या दवाखान्यात कोणालाही ती नको होती. कारण ती एक महिला होती.

शेवटी, माता आणि लहान मुलांच्या दवाखान्यात तिला शिकण्याची परवानगी मिळाली. तिथं आरडाओरडा आणि घाण होती. पण एलिजाबेथने तिथं खूप काही शिकायला मिळालं आणि ती खुश होती.

पॅरिस मध्ये असलेल्या माता आणि बालकांच्या या दवाखान्यात, नवजात शिशुना "इनक्यूबेटर्स" मध्ये ठेवलं जाई.



तेव्हा त्यांना डोळ्यांचा आजार झाला. त्या बघू शकत नव्हत्या. त्या आपल्या काम करू शकत नव्हत्या. त्यांच्यासाठी तो एक भयानक काळ होता.

काही महिने गेले. मग एका डॉक्टरांनी त्यांचा आजारी डोळा काढला आणि त्याच्या जागी एक काचेचा डोळा लावला. त्यामुळे त्यांची दुसरा डोळा मजबूत झाला आणि मग त्या परत कामाला लागल्या.



एलिजाबेथ ब्लॅकवेलने लंडन, इंग्लडमध्ये सेंट बार्थोलोम्यू दवाखान्यात काम केलं आणि अध्ययन केलं.

एलिजाबेथ लंडनच्या एका मोठ्या दवाखान्यात गेल्या. त्यांनी नवीन लोकांशी मैत्री केली आणि नवनवीन गोष्टी शिकल्या.



एकोणिसाव्या शतकात दवाखान्यांची हालत भयानक होती. न्यूयॉर्क मधला एक दवाखान्यात (वर) रुग्णांवर उंदीर पळत आहेत. डॉक्टर आपले नेहमीचेच कपडे घालत आणि रुग्णांना तपासल्यानंतर हात धूत नसत.



त्याकाळात दवाखाने म्हणजे घाणेरड्या जागा होत्या. तिथं काहीच धुतलं जात नसे.एवढंच नाही तर डॉक्टरांचे हात सुद्धा नाही.



लंडनमध्ये डॉक्टर ब्लॅकवेल, "डॉक्टोरियल बोरी" नावाचा कोट घातलेला..

एलिजाबेथला खूप चुकीचे वाटले. जर वस्तू साफ असत्या तर अधिक लोक लवकर बरे झाले असते. कदाचित ती ते बदलू शकली असती.

पण पहिले त्यांनी आपले जीवन बदलण्याचा विचार केला. त्या न्यूयॉर्क शहरात परत जावून सगळ्यात चांगलं काम करू शकत होत्या.

अध्याय 4

काम

लोक महिला डॉक्टरांकडे जायला कचरत.पण एलिजाबेथला माहित होते की वास्तवात कोणत्या लोकांना तिची गरज आहे-गरीब महिला आणि मुलं.

न्यूयॉर्क शहरात गरीब महिलांना सेंट बर्नबास होम मध्ये मोफत जेवण मिळे.





एका संस्थेच्या दुकानासमोर आजारी लोक, मोफत औषधांची वाट पाहतांना.

त्याकाळात काही गरीब मुलांना आईवडील नव्हते. ते अनाथ होते. एलिजाबेथने एका अनाथ मुलीला दत्तक घेतले.

लवकरच किट्टी त्यांचे मुल झाली. ती एलिजाबेथवर प्रेम करत होती आणि त्यांना "माई डॉक्टर“ म्हणत असे.

हजारों गरीब आणि अनाथ मुलं रस्त्यावर राहत आणि झोपत.




म्हणून एलिजाबेथने एक दवाखाना उघडला तेव्हा लोक येवू शकत होते आणि मोफत इलाज करून घेवू शकत होते.काही मित्रांनी तिच्यासाठी दान केलं होतं.

एलिजाबेथने आपल्या रुग्णांना सांगितलं की त्यांनी चांगलं जेवण घ्यायला पाहिजे. आराम करायला पाहिजे आणि स्वच्छ राहयला पाहिजे. तेव्हाच ते स्वस्थ होतील. त्यांनी चांगल्या आरोग्याविषयी पण भाषण दिले.



१८५७मध्ये न्यूयॉर्कमध्ये बीकमॅन डाउनटाउन दवाखाना. उजव्या बाजूला काळ्या आणि सफेद रंगाचे चित्र, एलिजाबेथ ब्लॅकवेलचा समजला जाई.

मग एलिजाबेथची बहीण एमेली सुद्धा डॉक्टर झाली. १८५७ मध्ये, एलिजाबेथ, एमेली आणि एक पोलिश महिला, डॉ. ज़कने गरीब महिला आणि मुलांसाठी एक नवा दवाखाना उघडला.



इतर महिला या दवाखान्यात नर्सचे शिक्षण घेवू शकत होत्या. हे अमेरिकेतले नर्स शिक्षणासाठीचे पहिले कॉलेज होते.




न्यूयॉर्क मध्ये महिलांसाठी न्यूयॉर्क इन्फर्मरी (वर). एलिजाबेथ ब्लॅकवेलने १८५७ मध्ये दवाखाना उघडला. डॉक्टर ब्लॅकवेलच्या नर्स विद्यार्थिनीना (उजवीकडे) पट्टी बांधण्यास शिकवले.





एलिजाबेथ ब्लॅकवेलच्या नर्सेस (वर आणि उजवीकडे) गृहयुद्धाच्या काळात आजारी आणि जखमी सैनिकांची काळजी घेतली.



राष्ट्रपती अब्राहम लिंकन

१८६०मध्ये अब्राहम लिंकन राष्ट्रपती झाले आणि १८६१ मध्ये युद्ध सुरु झाले. त्यात गुलामी संपली. म्हणून एलिजाबेथ खुश झाली होती.

एलिजाबेथने सैनिकांना मदत करण्यासाठी अनेक नर्सेस पाठवल्या. १८६४ मध्ये, एलिजाबेथ, वॉशिंगटन, डी.सी. गेल्या आणि राष्ट्रपती लिंकन यांना भेटल्या.

तोपर्यंत, एलिजाबेथला खात्री झाली होती की त्यांचा निर्णय योग्य होता. १८६५ मध्ये, त्यांच्या दवाखान्यात ३१,६५७ रुग्णांवर इलाज झाला होता. त्यापैकी फक्त पाच लोकांचा मृत्यू झाला, गोष्टी स्वच्छ ठेवल्याने खूप मदत झाली होती.


१८६८ मध्ये, एलिजाबेथने आपल्या दवाखान्याला महिलांचे एक मेडिकल कॉलेज जोडले. तिथं त्यांनी विद्यार्थींना वस्तू स्वच्छ ठेवण्यास आणि स्वस्थ राहण्यास शिकवले.



डॉक्टर ब्लॅकवेल इंग्लंडला परत आल्या. जिथं त्यांनी महिलांसाठी लंडन स्कूल ऑफ मेडिसिनची स्थापना करण्यात मदत केली.

तेव्हा त्यांना वाटलं की आता अमेरिकेतले त्यांचे काम पूर्ण झाले आहे. त्यांची बहीण एमेली तिथलं कॉलेज आणि दवाखाना चालवू शकते.

एलिजाबेथची इंग्लडला परत जाण्याची वेळ आली होती.




विद्यार्थिनी नर्स एका रूग्णाजवळ (वर) उभी आहे. १८७०च्या दशकात एलिजाबेथ ब्लॅकवेल (डावीकडे).

अध्याय ५
काही महत्वपूर्ण

इंग्लडमध्ये परत, एलिजाबेथ लढली.

त्यांनी महिला डॉक्टरांसाठी लढा दिला. त्यांनी स्वच्छता आणि गरीब महिला आणि मुलांच्या चांगल्या देखभालीसाठी लढा दिला.

एलिजाबेथने पुस्तकं लिहिली आणि भाषणं दिली. त्यांनी इतर दोन महिलांच्या बरोबर लंडन मध्ये महिलांसाठी एक मेडिकल कॉलेज सुरु केले. एलिजाबेथने तिथं शिकवलं.





एलिजाबेथ ब्लॅकवेल (उजवीकडे वर) आणि किट्टी आपल्या पाळीव कुत्र्यांबरोबर. एलिजाबेथचा छोटा भाऊ, हेन्री ब्लॅकवेल (डावीकडे), महिलांच्या अधिकाराबाबत बोलणारे ते एक प्रखर वक्ता होते.


१८७१मध्ये, त्यांनी नॅशनल हेल्थ सोसायटीची सुरुवात केली. त्यामुळे लोकांना निरोगी कसे राहायचे हे शिकण्यास मदत मिळाली.

त्या सर्व वर्षामध्ये किट्टी, एलिजाबेथच्या जवळ होती. एलिजाबेथ जेव्हा आजारी पडली तेव्हा तिने "माई डॉक्टर“ ची काळजी घेतली.





आज, दुनियाभर महिला डॉक्टर, चिकित्सा व्यवसायाच्या सगळ्या स्तरात सक्रिय आहे.



एलिजाबेथ ब्लॅकवेलने महिलासाठी वैद्यकीय व्यवसायाचे दार उघडले. त्यांनी ह्यूस्टन, टेक्सास मध्ये अशाप्रकारे आधुनिक दवाखाने उघडण्याचा मार्ग प्रशस्त केला.







एलिजाबेथ ब्लॅकवेल चे ३१ मे १९१० रोजी इंग्लड मध्ये निधन झाले. त्या ८९ वर्षाच्या होत्या. एक लाजाळू छोटी मुलगी जी काहीतरी महत्वपूर्ण कसे होईल याबाबत चिंता करे, तिने मोठं झाल्यावर कितीतरी महत्वपूर्ण कामं केली आणि लोकांना मदत केली.

महत्वपूर्ण तिथी

१८२१ फेब्रुवारी ३-इंग्लडच्या ब्रिस्टल मध्ये सॅम्युएल आणि हना ब्लॅकवेल च्या घरी जन्म घेतला.

१८३१ परिवाराबरोबर अमेरिकेत गेली.

१८३८ सिनसिनाटी, ओहायो मध्ये शिफ्ट झाली.

१८४९ जिनेवा, न्यूयॉर्क मध्ये जिनेवा मेडिकल कॉलेज मधून स्नातक डिग्री प्राप्त केली.

पॅरिस, फ्रांसमध्ये शिक्षण घेतले.

१८५३ न्यूयॉर्क शहरात गरीब महिला आणि मुलांसाठी दवाखाना उघडला.

१८५७ गरीब महिलासाठी दवाखाना उघडला न्यूयॉर्क शहरात

नर्ससाठी अमेरिकेत पहिलं प्रशिक्षण कॉलेज सुरु केलं

१८६८ महिलासाठी मेडिकल कॉलेज सुरु केलं.

१८६९ परत इंग्लडला आली.

१८७१ राष्ट्रीय स्वास्थ्य सोसायटीची स्थापना केली.

१९१० मे ३१ला हेस्टिंग्स, इंग्लंडमध्ये मृत्यु झाला.

समाप्त